पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,

# फुलंब्री

## अहवाल

## २०१६-१७

## मराठी विभाग

## डॉ. राजश्री पवार

## प्रमुख

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

## वार्षिक अहवाल २०१६-१७

## मराठी विभाग

**१) अभ्यागत तासिका**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम सत्रात एक व द्वितीय सत्रात एक या प्रमाणे अभ्यागत तासिकेचे आयोजन करण्यात आले. दि. २९ ऑगस्ट २०१६ रोजी निलेश देगावकर यांनी तासिका घेतली तर दि. १० जानेवारी २०१७ रोजी प्रा. डॉ. रामकिसन दहिफळे यांनी तासिका घेतली.

**२) भित्तीपत्रक**

दि. २९ सप्टेंबर २०१६ रोजी मराठी शुद्धलेखन विषयक नियम यावर आधारित भित्तीपत्रकाचे विमोचन प्रा. डॉ. डापके यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच दुसरे भित्तीपत्रक दि. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रा. जिजा शिंदे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या समग्र भाषेतील लेखकांवर आधारित भित्तीपत्रक बनविण्यात आले.

**३) मराठी भाषा पंधरवडा**

दि. १ जानेवारी ते १५ जानेवरी २०१७ या दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार मराठी भाषा पंधरवडा महाविद्यालयात मानण्यात आला. यानिमित्ताने ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनास विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनाही ते खुले होते. त्यांनीही या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ घेतला. प्रा. डॉ. दिनकर टकले यांनीही या ग्रंथप्रदर्शनास भेट दिली.

**४) व्याख्यान**

मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त मराठी भाषेचे वैभव या विषयावर प्रा. डॉ. रामकिसन दहिफळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**५) मराठी सप्ताह**

दि. १७ ते २३ फेब्रुवारी २०१७ या दरम्यान मराठी सप्ताह महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार मानण्यात आला. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन व स्पर्धा घेण्यात आल्या. कविता वाचन - प्रथम ढेपले लक्ष्मीकांत कारभारी, द्वितीय साबळे कृष्णा विष्णू, तृतीय डिडोरे सुनिल बाबुराव, वक्तृत्व स्पर्धा - प्रथम डिडोरे सुनील, द्वितीय ढेपले लक्ष्मीकांत, तृतीय साबळे कृष्णा, सुंदर हस्ताक्षर - प्रथम ढेपले लक्ष्मीकांत, द्वितीय साबळे कृष्णा, निंबध स्पर्धा - प्रथम ढेपले लक्ष्मीकांत, द्वितीय डिडोरे सुनील यांनी मिळवले.

तसेच या सप्ताहानिमित्त ग्रंथ प्रदर्शन ठेवण्यात आले. प्रा. डॉ. गणेश काकडे यांचे 'मराठी भाषेला बोलीभाषांचे योगदान' या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले. या कार्यक्रमानंतर स्थानिक लेखक म्हणून त्यांचे स्वरचितकाव्य विद्यार्थ्यांना कळावेत यासाठी विद्यार्थ्यांना विविध प्रश्न विचारून त्यांची मुलाखत घेतली. या सप्ताहाचा अहवाल शासनाला पाठविण्यात आला.

**६) मराठी भाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व प्रतिभावंत कवी श्री राजू जाधव उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. जिजा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. कल्याणकर पांडुरंग होते. मान्यवरांच्या हस्ते मराठी भाषा सप्ताह निमित्त आयोजित स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

**७) म्हणी व वाक्प्रचार संकलन**

स्थानिक म्हणी व वाक्प्रचारांचे संकलन करण्यात आले. एकूण पाच विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. या संकलनाचे एकत्र बाईडिंग करुन ठेवण्यात आले.

सह. प्राध्यापक
प्रा० डॉ. संजिवकुमार पांचाळ

प्रा. पवार आर. पी.




दि. 21 ऑगस्ट 2016 रोजी प्रा. निलेश देगांवकर
यांनी अभ्यागत घेतली.




दि. 10 जाने. 2017 रोजी डॉ. रामकिसन दहिफळे अभ्यागत
तासिका घेताना




डॉ. डापके यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे विमोचन
(दिनांक)-29.01.2016)




डॉ. जिजा शिंदे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे
विमोचन- (दिनांक-27 फेब्रु. 2017)




मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त 'मराठी भाषेचे वैभव" या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.रामकिसन दहिफळे



मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त ग्रंथप्रदर्शनास डॉ. दिनकर एकले यांनी भेट दिली.



मराठी भाषा सप्ताहानिमित्त विविध स्पर्धेत सहभागी स्पर्धक लक्ष्मीकांत देपले



मराठी भाषा सप्ताहानिमित्त नवलेखक प्रा. गणेश काकडे मार्गदर्शन करताना.




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. जीजा शिंदे.




मराठी भाषा सप्ताहनिमित्त उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कवी राजू जाधव-फुलंब्री.